। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २६७ वा । बुधवार दिनांक ०७ जानेवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### एक लाखाचे गंठण अज्ञाताने चोरले

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी तारामती भिमराव चव्हाण, वय ७० वर्षे, रा. तांबेवाडी आरमशाळा तांडा भातंब्रे ता.बार्शी जि. धाराशिव या दि.०४.०१.२०२६ रोजी नागोबा मंदीर तिर्थ खु येथे दर्शनासाठी गेले असता अज्ञात व्यक्तीने तारामत यांचे गळ्यातील मिनी गंठण एकुण १,००,०००किंमतीचे गर्दीचा फायदा घेवून चोरुन नेले. या प्रकरणी पोलिसात गुन्हा नोंदविला आहे.

### मुराजातीच्या म्हैसची चोरी

तुळजापूर (प्रतिनिधी)- गोठ्यात अंदाजे १,४०,००० किंमतीचे मुरा जातीची म्हैस ही दि.२२.१२.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी तारामती चव्हाण यांनी दि.०५.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### २२ लोखंडी पाईपची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गंगाधर रा. हावरगाव ता. कळंब जि. धाराशिव यांचे पिक लॅड कंपनीचे समोर मोकळ्या जागेत वाघोली शिवारातील इलेक्ट्रीक फिडर जोडणीचे काम चालू असल्याने त्या कामासाठी ठेवलेले २२ लोखंडी पाईप अंदाजे १,५४,००० किंमतीचे हे दि.०२.१२.२०२५ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गंगाधर कोल्हे यांनी दि.०३.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ७०,००० किंमतीचे ऑईल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१९.१०.२०२५ रोजी काटी उपकेंद्र येथे नवीन ५ एमव्हीए पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम चालू असताना दोन हजार लिटर काळपट रंगाचे ट्रान्सफॉर्मर मध्ये वापरण्यात येणारे ऑईल अंदाजे ७०,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी सचिन सुमंत चव्हाण, वय ४३ वर्षे, नोकरी सहायक अभियंता म.रा.वि.वि. कंपनी मर्या. माळुंब्रा रा. पदमजा डेव्हलपर्स छायादीप लॉन्सचे मागे धाराशिव यांनी दि.०३.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाड पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पराभवाने खचून जावू नका जनतेच्या कामात राहा यश जवळच आहे - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



तुळजापूर (प्रतिनिधी)- नगरपालिका निवडणुकीत निवडून आलेल्या तसेच पराभूत झालेल्या सर्व उमेदवारांचा सन्मानपूर्वक सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रसंगी निवडून आलेल्या उमेदवारांनी जनतेने दाखवलेल्या विश्वासास पात्र ठरत शहराच्या विकासासाठी कटिबद्ध राहावे, पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करावा तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत सर्वसमावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. असेही आवाहन करण्यात आले.

निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी खचून न जाता आपले सामाजिक कार्य, जनतेशी असलेले नाते आणि लोकहिताचे उपक्रम अधिक जोमाने सुरूच ठेवावेत, असा सकारात्मक संदेश देण्यात आला. निवडणूक हा राजकीय प्रवासातील केवळ एक टप्पा असून जनसेवा ही अखंड चालणारी साधना आहे. त्यामुळे विजय-पराजयाच्या पलीकडे जाऊन समाजहितासाठी सतत कार्यरत राहणे हीच खरी लोकशाहीची भावना असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. विजय-पराजयाच्या पलीकडे जाऊन सर्व उमेदवारांनी लोकशाही प्रक्रियेत दिलेले योगदान मोलाचे असून तुळजापूरच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे, समन्वयाने व सकारात्मक भूमिकेतून काम करणे ही काळाची गरज आहे.

या कार्यक्रमास काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्री. धीरज भैय्या पाटील, श्री. ऋषिकेश भैय्या मगर, शाम मामा पवार, शामलताई वड्ने, अर्जुन आप्पा साळुंके, सागर इंगळे, सुधीर कदम, राहुल खपले तसेच पक्षाचे इतर सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## असंघटीत महिलांसाठी सहकारी पतसंस्था ही काळाची गरज: श्रमिक महिला पतसंस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- असंघटित श्रमिक महिलांच्या विकासासाठी सरकारच्या अनेक योजना राबविण्यात येत आहेत. महिला प्रत्येक क्षेत्रात वाटचाल करीत आहेत. श्रमिक महिलांनी सहकारच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबी व्हावे. त्यासाठी श्रमिक महिलांच्या पतसंस्था ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मराठा महासंघाचे माजी जिल्हाध्यक्ष नंदकुमार गवारे यांनी केले. श्रमिक महिला को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या नवीन कार्यालयाचा उद्घाटन समारंभ सोमवार, ५ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता रमाई सदन, शिवाजी नगर सांजा रोड येथे संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जिजाऊ माँ साहेब सावित्रीबाई फुले, माता रमाई आंबेडकर आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. क्रेडिट सोसायटीचे उद्घाटन अंकुश कृष्णाजी भालेराव यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या अध्यक्ष अनिता आनंद भालेराव, उपाध्यक्ष शाहीन जाकेर शेख, संस्थेच्या संचालक सुवर्णा जवाहर कांबळे, महादेवी बाळासाहेब माळी, शैला प्रसाद दसपुते, सोनाली किरण नेटके, छाया हनुमंत मुठाळ, वैशाली अमोल शिंदे, कविता नीलम चंदनशिवे, अंजली आनंद भालेराव, सविता धनंजय बनसोडे, कविता घुले, मीना मगर, मनीषा मस्के, सायरा तांबोळी, शबनम शेख, भावना मेंढे, अश्विनी काळे, सविता मेंढे, इरशाद शेख, अंकुश भालेराव, आनंद भालेराव, अबोली भालेराव आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थितांना श्रीहरी चौहान, भाजपा नेते राजसिंह राजेनिंबाळकर, आनंद भालेराव यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वतंत्र मजूर जनरल कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) व युनिक बहुउद्देशीय सामाजिक संघटना तथा क्रेडिट सोसायटीचे व्यवस्थापकीय संचालक ए. ए. भालेराव यांनी केले. सूत्रसंचालन व आभार शरीफ शेख यांनी केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत २० सेवा जिल्ह्यात १५० दिवसांचा सेवा हमी उपक्रम

धाराशिव दि.५ जानेवारी (जिमाका) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अनुषंगाने प्रदान करण्यात येत असलेल्या महत्त्वाच्या विभागांतर्गत २० सेवा देण्यात येत आहेत.

लोकसेवा पुरवण्यासाठी विहित कालमर्यादेत नागरिकांना सेवा पुरविण्याची जबाबदारी महसूल विभागावर देण्यात आली आहे.महसूल विभागांतर्गत नागरिकांना आपले सरकार सेवा अंतर्गत उत्पन्नाचा दाखला,नॉन-क्रीमिलेअर,जात प्रमाणपत्र,रहिवासी दाखला,राष्ट्रीयत्वाचा दाखला अशा विविध सेवा नागरिकांना विहित मुदतीत देण्याचे काम महसूल विभाग करत आहे.जिल्ह्यात लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत आपले सरकार सेवा केंद्र अंतर्गत सेवा देण्यात येतात.

या सेवाबाबत जिल्ह्यातील उ्हरीरिहळीं पळल.ळप वर तसेच तुळजाई (ढींश्रक्षरळ) व लहरींलीं सेवा मोबाईल नंबर (९५७१९८९३२१) या क्रमांकावर नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.यामुळे नागरिकांना सेवा मिळवणे अधिक सुलभ झाले आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांना सेवा वेळेत मिळाव्यात व त्यांचा लाभ घेता यावा यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा देण्यात येत असून लवकरच आपले सरकार सेवांमध्ये इतर विभागांच्या सेवांचा देखील समावेश करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,त्यांनी या सेवांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. प्रशासन नागरिकांसाठी तत्पर सेवा उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असून याद्वारे प्रशासन व नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ होणार आहे. नागरिकांनी आपले सरकार सेवा केंद्र तसेच ऑनलाईन माध्यमांचा वापर करून सेवांचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

## तरुणाचा दगडाने ठेचून निर्घृण खून!

उमरगा (प्रतिनिधी)- : शहराच्या बायपास मार्गालगत कोरेगाववाडी रस्त्यानजीक एका तरुणाचा धारदार हत्यार व दगडाने ठेचून निर्घृण खून झाल्याची घटना उघडकीस आली. सकाळी नागरिकांना रस्त्याकडेला रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या खुनामागचे नेमके कारण काय आणि मारेकरी कोण, याचा शोध घेणे पोलिसांसमोर मोठे आव्हान असताना तपास सुरू केला असता रात्री उशिरा हाती आलेल्या माहितीनुसार या प्रकरणात पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले असून अधिक चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात येते की, या प्रकरणी अनैतिक संबंधाचे कारणावरुन शिवीगाळ करुन दगडाने मारहाण करुन जिवे ठार मारले असल्याचे समजते. पोलिस उपविभागीय अधिकारी सदाशिव शेलार, पोलिस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीकांत भराटे, पांडुरंग कन्हेरे, पोलिस पुजारवाड यांच्यासह पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## आदिवासी पारधी समाजाच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार - जिल्हाधिकारी कीर्ति किरण पूजार



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- आदिवासी पारधी समाजाच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ति किरण पुजार यांनी केले.

शबरी आवास योजनेंतर्गत घरकुल बांधकामाची पाहणी जिल्हाधिकारी कीर्ति किरण पुजार यांनी केली. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी आदिवासी पारधी समाज संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील काळे, नगरसेवक बापू पवार, दादा पवार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कीर्ति किरण पुजार म्हणाले की, आदिवासी पारधी समाजाच्या विकासासाठी ३८९ घरकुल मंजूर आहेत. या घरकुलांचे प्लास्टर राहिले आहे. त्यासाठी शून्य रॉयल्टी भरून वाळू उपलब्ध करून देण्यात येईल. जागेच्या पूर्ततेसाठी आठ अ आणि इतर कागदपत्र उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मार्ग काढण्यात येईल. त्याचबरोबर येथे क्रिडांगण, व्यायाम शाळा, कायस्वरूपी पाणीपुरवठा योजना, पिण्याच्या पाण्यासाठी टाकी, जागेसाठी आठ आ, अंतर्गत रस्ते, अंगणवाडी व इतर कामे करण्याची ग्वाही जिल्हाधिकारी कीर्ति किरण पुजार यांनी दिली. यावेळी आदिवासी पारधी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुफी संत हजरत खाजा शमशोद्दीन गाजी (रह.) यांच्या उरूसानिमित्त धाराशिव येथे भव्य संदल मिरवणूक



धाराशिव : ( शेख अंजुम ) सुफी संत हजरत खाजा शमशोद्दीन गाजी (रह.) यांच्या दर्गाहमध्ये वार्षिक उरूसानिमित्त भव्य व पारंपरिक संदल मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली. धार्मिक श्रद्धा, सूफी परंपरा आणि सामाजिक सलोखा यांचे प्रतीक असलेल्या या मिरवणुकीने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला.

परंपरेनुसार या संदल मिरवणुकीच्या प्रारंभाचा मान असतो जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजारा यांच्या डोक्यावर संदल देऊन मिरवणुकीची सुरुवात करण्यात आली. दर्गाह परिसरातून सुरू झालेली ही मिरवणूक शहरातील अरब मस्जिद येथून मार्गक्रमण करत पुन्हा दर्गाहमध्ये दाखल झाली.

या वेळी सज्जादे नशीन सय्यद सरफराज अब्दुल्ला हुसेनी, मुतवल्ली सय्यद शाफिक रफिक हुसेनी, सज्जादे इकरामुल्ला हुसेनी, सज्जादे पटेदार जफर मुजावर, सहाम पाशा फराश, जिल्हा वक्फ अधिकारी आमिर सय्यद, अतिकुल्ला हुसेनी, मोहसीन शेख यांच्यासह सर्व मानकरी उपस्थित होते. तसेच खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक रितु खोकर, अप्पर पोलीस अधीक्षक मेघना, धनंजय शिंगाडे, मसूद शेख, खलिफा कुरेशी, मोहीनुद्दीन पठाण, असदखान पठाण, ॲड. परवेज, समियोद्दीन मशायक, वाजिदखान पठाण, शेख आयाज, इस्माईल शेख, बाबा मुजावर, नदीरुल्ला हुसेनी नेहाल शेख,आरिफ शेख, फेरोज पठाण, अमजद शेख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशे, धार्मिक घोषणांमधून निघालेल्या या मिरवणुकीत शांतता, एकता व बंधुभावाचा संदेश देण्यात आला. उरूसानिमित्त दर्गाहमध्ये चादरपोशी, दुआ, कव्वाली व लंगराचे आयोजन करण्यात आले असून सर्वधर्मीय भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेतले.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रात्री उशिरापर्यंत संदल मिरवणूक व धार्मिक कार्यक्रम सुरू होते.

ही संदल मिरवणूक धार्मिकतेबरोबरच सामाजिक ऐक्य जपणारा उत्सव ठरल्याची भावना भाविकांतून व्यक्त होत होती.

## मोटरसायकल धडकेत एकाचा मृत्यु तर दुसरा जखमी

परंडा(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत अरुण सुब्राव भोसले, वय ३८ वर्षे, व सोबत जखमी नामे- नवनाथ जगन्नाथ वाघमोडे, वय ५५ वर्षे, विलास एकनाथ सरक, वय ७० वर्षे, तिघे रा. ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव हे दि.२८.१२.२०२५ रोजी १९.३० वा. सु. मोटरसायकल वरुन जात होते. दरम्यान जवळा नि. ते ढगपिंपरी फाटा जाणारे रोडवर त्रिंबक यादव यांचे शेताचे समोर चार चाकी गाडीचा चालकाने त्याचे ताब्यातील चारचाकी गाडी ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून अरुण भोसले यांचे मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात अरुण भोसले हे गंभीर जखमी होवून मयत झाले. तर नवनाथ वाघमोडे, विलास सरक हे जखमी झाले. फिर्यादी नामे-सोनाली अरुण भोसले, वय ३० वर्षे,ढगपिंपरी ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.०५.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१),२८१, १२५(ए), सह १८३, १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

